Vol 1 Issue 6 Dec 2011
ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN No-2231-5063 Vol.1,Issue.VI/Dec 2011pp.1-4

Research Paper

# "मुस्लीम मराठी कविता"


## शकील शेख

सा. प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,
ता. बार्शी, जि. सोलापूर,



*सारांश*

साहित्य हे मानवी जीवनाचा आरसा आहे. मानवी जीवनाच्या व्यथा, वेदना, सुख, दुःख अशा विविध गोष्टी साहित्यातून व्यक्त होत असतात. साहित्यिक हा समाजाचा एक घटक असल्याने तो समाजातील विविध घटना प्रसंगांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून योग्य न्याय देण्याचा प्रयत्न करत असतो.


### *प्रास्तावना*

ललित साहित्यातून या घटना प्रसंगाना तो रसिकांच्या समोर आणत असतो. तसा ललित साहित्याचा आणि कोणत्याही जाती-धर्माचा प्रत्यक्ष संबंध नसतो. तरी पण काही एक मर्यादेपर्यंत हा संबंध जोडला जाऊ शकतो किंवा जोडला जातो. कारण महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात जात हा आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण आणि अविभाज्य घटक आहे. त्यामुळे ललित साहित्यात दलित साहित्य, खिस्ती साहित्य, जैन मराठी साहित्य, वीरशैव साहित्य, मुस्लीम मराठी साहित्य असे विविध प्रकार पडलेले दिसून येतात.

१९८० नंतर मुस्लीम मराठी साहित्य फार मोठ्या प्रमाणात लिहिले जाऊ लागले. या पाठीमागे विविध कारणे आहेत, त्या मागचे एक कारण सांगताना प्रा. फ. म. शहाजिंदे म्हणतात, 'भारतीय प्रांतांच्या विविधतेत जीवन व्यतीत करणारे हे मुस्लीम मन अल्पसंख्यांक मानसिकतेने वेढलेले आहे. हे मन मूलतत्त्ववाद, जातीव्यवस्था आणि आधुनिक शिक्षणाने प्रभावित झालेले मन, आंतरधार्मिक विवाह, धर्मांतर, निवडणुका, राष्ट्रनिष्ठा, पर्सनल लॉ, समान नागरी कायदा, पोटगी, उर्दू भाषा, मस्जिद व कब्रस्तान या विषयावर संवेदनशील बनते'. साहित्यिकांचे संवेदनशील मन, आपल्या मनातील भावभावना शब्दाद्वारे कागदावर व्यक्त होतात. १९८० नंतरच्या कालखंडात मुस्लीम समाजातील जे तरूण शिकून पुढे आले. त्यांना सामाजिक, स्थितीगतीचे जे भान आले ते व्यक्त करण्यासाठी त्यांनी काव्याचा आधार घेतला.

मुस्लीम मराठी साहित्यिकांमध्ये काव्य लेखन करणारे अनेक नामवंत कवी आहेत. शाहीर अमर शेख, बद्‌दीउज्जमान खावर, प्रा. अजीज नदाफ, खलील मोमीन, इलाही जमादार, फ. म. शहाजिंदे या सारख्या कविंनी मुस्लीम मराठी कविता समृध्द केली.

शाहीर अमर शेख हे कवी तसेच शाहीर होते. त्याचे (१) अमरगीत, (२) कलश, (३) धरतीमाता असे तीन काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. अमरगीतमध्ये शाहीर अमर शेख यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे चित्रण केले आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत असलेला शेतकरी, सावकारी पाशात सापडलेला शेतकरी याचे चित्रण ते यात करतात. शेतकरी व सावकार यांच्या संघर्षाबरोबरच भांडवलदार-मजूर, मजूर-मालक यांच्यातील संघर्षही ते चित्रित करतात. शेतकरी, कष्टकरी, मजूर, कामगार यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याची आणि त्यांच्यात एक स्फुल्लिंग चेतवण्याचे काम शाहीर अमर शेख करतात. समाजाला जुलुमाच्या, अन्यायाच्या विरूध्द पेटून उठवण्याचे कार्य ते आपल्या काव्यातून करतात. 'अमरगीत' प्रमाणेच 'कलश' या कवितासंग्रहामध्ये देखील ते सामाजिक वेदनेचे दर्शन घडवतात. त्यांना समाजात मानवता फुलवायची होती. लाल रंग हे क्रांतीचे प्रतिक असून क्रांतीचा अचूक वेध ते घेतात आज जरी निराशा सर्वत्र दिसत असली तरी अमर शेखांच्या कवितेत आशावाद आहे. तसेच अमर शेख यांच्या काव्यातून देशप्रेम, देशाभिमान या विषयीच्या भावनाही उत्कटपणे प्रकट होतात. अमर शेख यांच्या 'धरतीमाता' या कविता संग्रहातून सामाजिक, आर्थिक शोषणावर भाष्य येते. विकृत संस्कृतीविषयी ते परखडपणे बोलतात. अन्याय, अत्याचार सहन करणे त्यांना आवडत नाही. लाचारी, अगतिकता यावर ही ते परखड भाष्य करतात. 'धरतीमाता' हा काव्यसंग्रह म्हणजे सामाजिक वास्तवतेचे ज्वलंत चित्रण होय.

प्रा. फ. म. शहाजिंदे यांची कविता ही विद्रोही कविता आहे. फ. म. शहाजिंदे यांचे (१) निधर्मी, (२) शेतकरी, (३) आदम, (४) ग्वाही असे चार काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. शहाजिंदे यांच्या कवितेतून येणारा विद्रोह हा त्यांच्याकडे परकेपणाच्या भावनेतून जे पाहिले जाते, त्यातून निर्माण होतो. मुसलमान किती ही सदगुणी असला तरी त्यावर हिंदूचा विश्वास बसत नाही, ही शहाजिंदेची भावना आहे. सतत मुस्लीमांकडे संशयाच्या नजरेने पाहणे आणि त्यांची उपेक्षा करणे, या कारणांमुळे शहाजिंदेंच्या मनात जी चिड निर्माण होते ती ते आपल्या काव्यातून व्यक्त करतात. शहाजिंदे आपल्या 'कमाई' या कवितेत म्हणतात,

माझी उणी काढून  
तुमच्या अस्तित्त्वाची कल्हई होत असेल तर  
काहीच हरकत नाही  
आताशा मला घुबडांचा स्वरही मधुर वाटतोय,  
काय आहे,  
माझ्या अस्तित्त्वावर मी केंव्हाच्या फात्या पढल्यात  
तुमच्या कॉमेन्टसनीतर  
जीवंत असल्याचा भास झाला  
चला.  
ही कमाई ही काही थोडी थोडकी नाही !

*प्रास्तावना*

ललित साहित्यातून या घटना प्रसंगाना तो रसिकांच्या समोर आणत असतो. तसा ललित साहित्याचा आणि कोणत्याही जाती-धर्माचा प्रत्यक्ष संबंध नसतो. तरी पण काही एक मर्यादेपर्यंत हा संबंध जोडला जाऊ शकतो किंवा जोडला जातो. कारण महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात जात हा आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण आणि अविभाज्य घटक आहे. त्यामुळे ललित साहित्यात दलित साहित्य, ख्रिस्ती साहित्य, जैन मराठी साहित्य, वीरशैव साहित्य, मुस्लीम मराठी साहित्य असे विविध प्रकार पडलेले दिसून येतात.

१९८० नंतर मुस्लीम मराठी साहित्य फार मोठ्याा प्रमाणात लिहिले जाऊ लागले. या पाठीमागे विविध कारणे आहेत, त्या मागचे एक कारण सांगताना प्रा. फ. म. शहाजिंदे म्हणतात, 'भारतीय प्रांतांच्या विविधतेत जीवन व्यतीत करणारे हे मुस्लीम मन अल्पसंख्यांक मानसिकतेने वेढलेले आहे. हे मन मूलतत्त्ववाद, जातीव्यवस्था आणि आधुनिक शिक्षणाने प्रभावित झालेले मन, आंतरधार्मिक विवाह, धर्मांतर, निवडणुका, राष्ट्रनिष्ठा, पर्सनल लॉ, समान नागरी कायदा, पोटगी, उर्दू भाषा, मस्जिद व कब्रस्तान या विषयावर संवेदनशील बनते'. साहित्यिकांचे संवेदनशील मन, आपल्या मनातील भावभावना शब्दाद्वारे कागदावर व्यक्त होतात. १९८० नंतरच्या कालखंडात मुस्लीम समाजातील जे तरूण शिकून पुढे आले. त्यांना सामाजिक, स्थितीगतीचे जे भान आले ते व्यक्त करण्यासाठी त्यांनी काव्याचा आधार घेतला.

मुस्लीम मराठी साहित्यिकांमध्ये काव्य लेखन करणारे अनेक नामवंत कवी आहेत. शाहीर अमर शेख, बद्दीउज्जमान खावर, प्रा. अजीज नदाफ, खलील मोमीन, इलाही जमादार, फ. म. शहाजिंदे या सारख्या कविंनी मुस्लीम मराठी कविता समृध्द केली.

शाहीर अमर शेख हे कवी तसेच शाहीर होते. त्याचे (१) अमरगीत, (२) कलश, (३) धरतीमाता असे तीन काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. अमरगीतमध्ये शाहीर अमर शेख यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे चित्रण केले आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत असलेला शेतकरी, सावकारी पाशात सापडलेला शेतकरी याचे चित्रण ते यात करतात. शेतकरी व सावकार यांच्या संघर्षाबरोबरच भांडवलदार-मजूर, मजूर-मालक यांच्यातील संघर्षही ते चित्रित करतात. शेतकरी, कष्टकरी, मजूर, कामगार यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याची आणि त्यांच्यात एक स्फुल्लिंग चेतवण्याचे काम शाहीर अमर शेख करतात. समाजाला जुलुमाच्या, अन्यायाच्या विरूध्द पेटून उठवण्याचे कार्य ते आपल्या काव्यातून करतात. 'अमरगीत' प्रमाणेच 'कलश' या कवितासंग्रहामध्ये देखील ते सामाजिक वेदनेचे दर्शन घडवतात. त्यांना समाजात मानवता फुलवायची होती. लाल रंग हे क्रांतीचे प्रतिक असून क्रांतीचा अचूक वेध ते घेतात आज जरी निराशा सर्वत्र दिसत असली तरी अमर शेखांच्या कवितेत आशावाद आहे. तसेच अमर शेख यांच्या काव्यातून देशप्रेम, देशाभिमान या विषयीच्या भावनाही उत्कटपणे प्रकट होतात. अमर शेख यांच्या 'धरतीमाता' या कविता संग्रहातून सामाजिक, आर्थिक शोषणावर भाष्य येते. विकृत संस्कृतीविषयी ते परखडपणे बोलतात. अन्याय, अत्याचार सहन करणे त्यांना आवडत नाही. लाचारी, अगतिकता यावर ही ते परखड भाष्य करतात. 'धरतीमाता' हा काव्यसंग्रह म्हणजे सामाजिक वास्तवतेचे ज्वलंत चित्रण होय.

प्रा. फ. म. शहाजिंदे यांची कविता ही विद्रोही कविता आहे. फ. म. शहाजिंदे यांचे (१) निधर्मी, (२) शेतकरी, (३) आदम, (४) ग्वाही असे चार काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. शहाजिंदे यांच्या कवितेतून येणारा विद्रोह हा त्यांच्याकडे परकेपणाच्या भावनेतून जे पाहिले जाते, त्यातून निर्माण होतो. मुसलमान किती ही सदगुणी असला तरी त्यावर हिंदूचा विश्वास बसत नाही, ही शहाजिंदेची भावना आहे. सतत मुस्लीमांकडे संशयाच्या नजरेने पाहणे आणि त्यांची उपेक्षा करणे, या कारणांमुळे शहाजिंदेंच्या मनात जी चिड निर्माण होते ती ते आपल्या काव्यातून व्यक्त करतात. शहाजिंदे आपल्या 'कमाई' या कवितेत म्हणतात,

माझी उणी काढून
तुमच्या अस्तित्त्वाची कल्हई होत असेल तर
काहीच हरकत नाही
आताशा मला घुबडांचा स्वरही मधुर वाटतोय,
काय आहे,
माझया अस्तित्त्वावर मी केंव्हाच्या फात्या पढल्यात
तुमच्या कॉमेन्टसनीतर
जीवंत असल्याचा भास झाला
चला.
ही कमाई ही काही थोडी थोडकी नाही !

जातीवरून, धर्मावरून, भाषेवरून, नावावरून केली जाणारी टिप्पणी ही मनाला सलणारी आहे. ती सल कविला जाणवते पण तरी ज्या समाजात वावरायचे आहे तिथे चांगले आणि वाईट दोन्ही असणारच म्हणून वाईटांचेही बोल कवी गोड मानून घेतो आहे.

शहाजिंदे यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे काव्य याबद्दल प्रा. फकरूद्दिन बेन्नुर आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, 'शहाजिंदे हे पूर्णपणे 'मराठी मुसलमान' असून त्यांचा धर्म ईदची नमाज आणि खुदब्यापुरताच असून ते सर्वार्थाने ग्रामीण मराठवाड्याचा अंश आहेत. ते पूर्णपणे मराठी असताना केवळ त्यांचा धर्म इस्लाम आहे. म्हणून त्यांच्याकडे जे सतत संशयाने आणि उपेक्षेने पाहिले गेले त्या सर्व घटकांच्या संकलित परिणामातून त्यांची कविता उभी राहिली आहे'. शहाजिंदे यांचा निधर्मी काव्यसंग्रह धर्माची फुटपट्टी लावून माणसाला तुच्छ लेखाणाच्या परंपरेविरूध्द आवाज उठवणारा आहे. 'आदम' हा काव्यसंग्रह माणूसकीवर बेतलेला आहे. भारतीय म्हणून सर्वांकडून समानतेच्या वागणूकीची अपेक्षा ते करतात. तर 'ग्वाही' मध्ये भारतातला जातीयवाद, जमातवाद, सामाजिक, राजकीय भ्रष्टाचार या विषयी ते जाब विचारताना दिसतात.

बद्दीउज्जमान खावर यांनी मुस्लीम मराठी साहित्यात गझल या काव्यप्रकाराची सुरूवात केली. त्यांचे (१) गझलात रंग माझा, (२) माझिया गझला मराठी हे गझल संग्रह प्रसिध्द आहेत. खावर यांनी आपल्या गझलांमधून उत्कट प्रेम, प्रेमातील व्यथा वेदना, सामाजिक वास्तवता इत्यादी गोष्टींचे वर्णन केले आहे. तर इलाही जमादार यांचे (१) जखमा अशा सुगंधी, (२) भावनांची वादळे ही दोन गझल संग्रहे आणि वाटसरू हा कविता संग्रह प्रसिध्द आहे. इलाही जमादार यांनी गझल बांधणीचे एक नवीनच तंत्र आपल्या गझलमधून आणलेले दिसून येते.

प्रा. अजीज नदाफ हे कवी, शाहीर, गझलकार म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित आहे. प्रा. अजीज नदाफ यांच्या लेखनावर मार्क्सवादाचा प्रभाव आहे. त्यांचे (१) वेदना, (२) हा छंद गझलांचा, (३) मानवी, (४) तो सुर्य आज आला, (५) गीत छत्रपती इत्यादी काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. प्रा. अजीज नदाफ हे सर्वसामान्यांचे दुःख, दारिद्र्या आपल्या कवितेतून मांडतात. शहरी जीवनातील दुःख, दारिद्र्या जगण्यासाठी केली जाणारी तडजोड, धडपड ते आपल्या काव्यातून व्यक्त करतात. शहरी

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org